क्रमांक : ४२

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरूवार, दिनांक १३ जून, २०२४ / ज्येष्ठ २३, शके १९४६

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

४२. विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २६६ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनाक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १२४ निवेदने मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ८ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण १४२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४४ निवेदने सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक २६ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनापैकी ८ सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ३७ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ९० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०६ निवेदने शाखेत प्राप्त झाली. उर्वरित प्रलंबित ८४ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्माननीय विधानसभा सदस्यांनी संपूर्णतः ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १३ जून, २०२४

जितेंद्र भोळे
सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

१. संगणक कक्ष (website.)

२. अनुवाद कक्ष

३. प्रतिवेदन

लक्षवेधी सूचना क्र.२१३७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**मा. श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना.**

---

"ठाणे जिल्हयातील तालुका ठाणे मौजे बाळकुम विभागात शेतकऱ्यांच्या जमीन मिळकतीमध्ये बेकायदेशीर फेरफार नोंदी करण्यात आलेबाबत तेथील अनेक शेतकऱ्यांनी दिनांक २९.११.२०२३ रोजी अधिक्षक भूमि अभिलेख, पोलीस उपआयुक्त व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रारी दाखल केले असतांना तहसीलदार भूअभिलेख रेकॉर्ड शाखा यांच्या विभागात पिकपाणीच्या उताऱ्यामध्ये बेकायदेशीर नोंदी घेऊन बनावट पिकपाणीचे उतारे घडवून संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी गैरव्यवहारातून गैरप्रकार करुन बाळकुम माजीवाडा तथा घोडबंदर रोडवरील जमिनींमध्ये बिल्डरांचा करोडो रुपयांचा फायदा केलेला आहे. मौजे बाळकुम स्थित सोनीबाई बाळया पाटील यांना जुना सर्व्हे क्र. ९३/२१ ही जमीन गटबुक गुणाकार बुक आकारबंद व हिस्सा फॉर्म नं. ४ प्रमाणे फेरफार क्र. २५०८ ने मिळालेले असतांना तत्कालीन तलाठयांनी विना फेरफार तिऱ्हाहित इसमांचा सातबारा घडवून आणल्याने या प्रकरणाची पोलिस उपायुक्तांमार्फत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

अर्जदार श्री. रोहिदास इंद्रपाल पाटील यांनी दिनांक २९/११/२०२३ रोजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे व उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडे निवेदन दिलेले आहे.

सर्व्हे नं. ९३/२१ चा सन १९५०-५१ चा पिक पाहणी उतारा पाहता कब्जेदार सदरी लक्ष्मण धर्मा भोईर व इतर यांची नांवे आहेत. त्यामध्ये सर्व्हे नं. ९३/२१ मध्ये (गोळा सर्व्हे नंबरमध्ये) कब्जेदार सदरी सन १९५१-५२ चा पिक पाहणी उतारा पाहता सोनीबाई बाळया पाटील हिच्या नावाची कब्जेदार सदरी नोंद दिसुन येत नाही. कालातंराने सर्व्हे नं. ९३/२१ चा हिस्सा फॉर्म नं. ४ घडलेला असुन तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांचेकडील गुणाकार बुक व हिस्सा फॉर्म नं. ४ चा उतारा पाहता सर्व्हेक्षण करतेवेळी जागेवर उपस्थित असलेल्या व्यक्तींची नांवे गुणाकार बुक व हिस्सा फॉर्म नं. ४ ला नोंदविणेत आलेली आहेत. त्यामध्ये सोनीबाई बाळया पाटील व मोत्या नागो भोईर यांच्या नावाची नोंद आहे. एकंदरीत पिकपाहणी गा.न.नं. ७/१२, फेरफार, गुणाकार बुक व हिस्सा फॉर्म नं. ४ पाहता सोनीबाई बाळया पाटील व मोत्या नागो भोईर हे जमिनीचे मुळ मालक नसल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास दिसून येते. प्रकरणी गांवी नोंदविणेत आलेला फेरफार क्र. २५०८, दिनांक ०५/८/१९८० पाहता हिस्सा फॉर्म नं. ४ आले वरुन सर्व्हे नं. ९३/२१/अ क्षेत्र ०-०३-०० हे.आर. मध्ये सोनीबाई बाळया पाटील व सर्व्हे नं. ९३/२१/ब क्षेत्र ०-०४-०० हे.आर मध्ये मोत्या नागो भोईर यांची वहीवाट असल्याने गांव दप्तरी फेरफार नोंद घेणेत आली होती. परंतु सदर फेरफार शेरे कोष्ठकी "तक्रार रजिष्टरचे निकालाप्रमाणे प्रस्तुत नोंद रद्द केली असे" असा शेरा नमुद करुन सदरचा फेरफार रद्द करणेत आला आहे.

सदरचा फेरफार क्र.२५०८ अद्यापपर्यंत वरीष्ठ न्यायालयात आव्हानित केलेला दिसुन येत नाही. त्यामुळे उक्त फेरफारानुसार सोनीबाई बाळया पाटील यांचे नांव अधिकार अभिलेखात दाखल करता येणार नाही. तसेच तत्कालीन तलाठी यांनी फेरफार क्र. २५०८ नोंदविताना जी परस्थिती गा.न.नं. ७/१२ सदरी होती तीच परिस्थिती गा.न.नं. ७/१२ सदरी ठेवली असुन तिऱ्हाईत ईसमांचा गा.न.नं. ७/१२ घडविल्याचे दिसुन येत नाही.

सदर मिळकतीमध्ये उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे कार्यालयाकडून पोटहिस्सा मोजणी अगर अभिलेख दुरुस्ती झालेली नाही तसेच गा.न. नं. ७/१२ दुरुस्ती संदर्भात कोणताही बदल करणेंत आलेला नाही. तथापि, अर्जदार यांची तक्रार ही गा.न. नं. ७/१२ अधिकार अभिलेखातील नोंदी संदर्भात असल्याने अर्जदार यांनी अधिकार अभिलेख गा.न. नं. ७/१२ मधील फेरफार नोंदीबाबत सक्षम महसूल प्राधिकारी यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ प्रमाणे अपील दाखल करुन दाद मागून घेणे आवश्यक आहे. तसे तक्रारदार श्री.रोहिदास इंद्रपाल पाटील यांना उपअधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी दिनांक १८.१२.२०२३ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

सदर जमीन मिळकतीमध्ये आजरोजी असलेले भोगवटादार तुळशीराम कृष्णा भोईर व इतर यांचा मालकी हक्क हा वेळोवेळी झालेल्या फेरफारानुसार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे वरील नमुद करणेत आलेल्या फेरफारामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२१५२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" भिवंडी ता.जि. ठाणे येथील गेल्या चार वर्षात दिवाणी न्यायालयाकडून वारसाने दाखल करणे कामी दिलेल्या आदेश दिवाणी वारस प्रमाणपत्रामधील मौजे-भरोडी व कोलिवलीतील सर्व सर्व्हे नंबरसाठी पुनर्विलोकन घेण्यासाठी व टेमघर येथील सर्व्हे क्रमांक १२५ व इतर २०१६ मध्ये कुठलाही फेरफार न टाकता कमी केलेल्या नावाचे अंमल देणेकामी कामतघर सर्व्हे क्र. १३५/२ मध्ये नाव कमी करण्यासाठी सख्ख्या बहिण कुटूंबदारांची जबाब प्रतिज्ञापत्र न घेता फेरफार क्रं. १७०३ ने बहिणींची नोंद कमी केल्याने पुनर्विलोकन घेऊन नव्याने बहिणींची नावे वारसाने दाखल करणे कामी व इतर शेतकऱ्यांची लाखीवली व इतर सहा गावे यांचे वारसांची नावे दाखल करणे कामी अनेक शेतकऱ्यांनी अर्ज केले असणे, भिवंडीतील अनेक जमिन मिळकतीत कुटूंब प्रमुखांनी भाऊबंधकी व बहिणींचे वारस लपवून प्रतिज्ञापत्र सादर करुन सातबारा सदरी वारस लावतांना प्रतिज्ञापत्रात वारसांची माहिती लपवल्यास कलम १९८, १९९, २०० व १९३/२ प्रमाणे शिक्षेसपात्र राहू असे जमिन मिळकतीतील कुटूंब प्रमुखाने प्रतिज्ञापत्र दिल्याने अशी खोटी माहिती देऊन व लपवून प्रतिज्ञापत्रावरुन फेरफार टाकणाऱ्यांचे फेरफार रद्द करुन वारसांची फेरचौकशी होण्यासाठी प्रधान सचिव, महसुल विभाग यांच्याकडे दि. १३.१२.२०२१ रोजी रोहिदास तरे यांच्या तक्रारीवरुन पुनर्विलोकनाचे आदेश महसुल मंत्री यांनी दिले असल्यामुळे अश्या खोट्या प्रतिज्ञापत्रांमुळे अर्धन्यायिक प्रकरणे वाढविणे, या प्रकरणांची समस्या कमी होण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा तहसिलदार यांच्याकडे तात्काळ पुनर्विलोकनाचे कायदेशीर कामकाजासाठी शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पुनर्विलोकनाचे कामकाज प्रक्रिया राबवण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय अवलंबुन याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

---

### श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

**मौजे भरोडी :-**

स.नं. १२१/७, व इतर सर्वे नंबरच्या जमिनीस १) तुकाराम दुंद्या पाटील २) कृष्णा दुंद्या पाटील ३) बाळू दुंद्या पाटील व ४) भागीबाई भास्कर भोईर असे असे वारस होते. परंतु फेरफार क्रमांक ६२८३ दिनांक २६/८/१९९३ या फेरफराने फक्त १) तुकाराम दुंद्या पाटील, २) कृष्णा दुंद्या पाटील व ३) बाळू दुंद्या पाटील यांच्या नावाची नोंद झाल्याने फेरफार क्रमांक ६२८३, दिनांक २६/८/१९९३ पुर्नविलोकनात घेऊन अशंत: बदल करुन श्रीमती भागीबाई भास्कर भोईर यांचे नाव समाविष्ट करणेकामी पुर्नविलोकनाचा प्रस्ताव तहसीलदार भिवंडी यांचेकडुन दि. ५/१२/२०२३ रोजी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचेकडे सादर केला आहे.

सर्व्हे नं. ८/४ (जुना स.नं. १६२/४), व इतर ६ हे सर्व्हे नं. येथील जमीन उंद्रया नाना भोईर यांनी वल्लभदास शंकरभाई पटेल, रा. मुंबई यांना दि.३१/१२/४५ रोजी खरेदीखताने विक्री केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या वारसांची नावे लावण्याचा प्रश्न उद्धवत नाही.

स.नं. ९२ (जुना स.नं. २२८) ह्या जमिनीबाबत उंद्रया नाना भोईर हे दि. ४/५/२००२ रोजी अविवाहीत मयत झाल्याने फेरफार क्रं. १४०५, दि. २१/२/२०२३ अन्वये उंद्रया नाना भोईर यांचे नाव कमी करण्यात आले आहे. त्यामुळे स.नं. ९२ (जुना २२८) बाबतचा फेरफार क्रमांक १४०५ हा पुर्नविलोकनामध्ये घेऊन उंद्रया नाना भोईर यांचे नाव पुर्ववत करुन अर्जदार यांनी मा.न्यायालयाकडील सादर केलेल्या वारस दाखल्यानुसार कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना कळविणेत आले आहे.

**मौजे कोलीवली :-**

मौजे कोलवली येथील फेरफार क्रमांक ५२५, दि. १२/४/१९८२ अन्वये मयत भागीबाई मंगळ्या म्हात्रे यांना वारस मुलगा/मुलगी नसलेने स.नं. १०६/५ व इतर १६ स.नं. सदरी त्यांच्या भावांची नावे लावलेली आहेत. मात्र स.नं. १०६/५ या स.नं.ला फेरफार क्रमांक ५२५ चा अंमल दिला नसलेने भागीबाई मंगळया म्हात्रे यांचे वारसांची नावे फेरफार क्रमांक १००५, दि.६/३/२०१३ अन्वये ७/१२ ला दाखल करणेत आलेली आहेत.

भागीबाई मंगळया म्हात्रे यांचे वारस मा. दिवाणी न्यायालयाने निश्चित करुन वारस प्रमाणपत्र दिलेले असल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे त्यांना वारस मुलगा/मुलगी कोणीही नाही, म्हणून फक्त भावांची नावे दाखल केलेला फेरफार क्रमांक ५२५ हा अयोग्य आहे, असे दिसून येते. त्यामुळे मा.न्यायालयाच्या वारसाबाबतच्या आदेशाप्रमाणे वारसांची नावे ७/१२ वर घेऊन चुकीचा फेरफार पुनर्विलोकनात घेणेची कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी भिवंडी यांना कळविण्यात आलेले आहे.

**मौजे टेमघर:-**

मौ. टेमघर. ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स.नं. १२५ व इतर ४ स.नं. हे क्षेत्राचे नोंदणीकृत खरेदीखताने अब्बास महंमद अ.पा.क. महंमद याकूब चिमण मोमीन यांचेकडून जसकोरबाई भ्र. बाबुभाई नरोमनदास कंसारा यांचे नावे फेरफार क्र. ४०१ अन्वये हस्तांतरण झालेले आहे. व तद्नंतर सन १९६७ मध्ये जसकोरबाई भ्र. बाबुभाई नरोमनदास कंसारा यांचेकडून खरेदीखताने आर्मिनल सिल्क मिल प्रा. लि. चे रेवाचंद मुलचंद मंगलानी यांनी विकत घेतले आहे.

विषयांकित मिळकतीवरील अब्बास महमद अ.पा.क. महंमद याकुब चिमण मोमीन यांचे नाव सन १९५१ पासून कमी झालेले असून त्यास ७० वर्षाचा कालावधी झालेला आहे व सदर मिळकती नोंदणीकृत दस्ताद्वारे हक्क प्रस्थापित झालेले आहे. त्यामुळे तहसीलदार, भिवंडी यांनी दि. २५/१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांचे नाव दाखल करण्याची विनंती कलम १५५ अन्वये मान्य करता येणार नाही, असे संबंधितांना कळविले आहे.

**मौजे कामतघर:-**

मौजे कामतघर, ता.भिवंडी येथील स.नं. १३५/२पै या मिळकतीवरील फेरफार क्र. १७०२, दि. ८/१/१९७६ अन्वये रघुनाथ गोविंद तरे मयत यांचे वारस अशोक रघुनाथ तरे व इतर ४ यांची नावे वारस म्हणुन दाखल झालेली आहेत. तदनंतर फेरफार क्रमांक १७०३ दिनांक ८/१/१९७६ अन्वये वारस मुली शंकुतला लक्ष्मण चौधरी इतर ३ मुली यांची नावे कबुली जबाबाने कमी करण्यांत आलेली आहेत. उक्त मिळकतीबाबत तदनंतर एकुण २४ फेरफार मंजुर झालेले आहेत. सदरचे फेरफार वारस नोंदी व खरेदी व्यवहाराबाबत आहेत. सदर फेरफार व खरेदीदस्त आजरोजी अस्तीत्वात आहेत. सबब सदरचे फेरफार नोंदवितांना सकृतदर्शनी कोणतीही अनियमितता दिसून येत नसल्याने पुनर्विलोकनात घेणे उचित होणार नाही. सदरचे फेरफार मान्य नसल्यास अर्जदार यांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक असलेबाबत मंडळ अधिकारी, भिवंडी यांनी दि. ०३/११/२०२१ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**मौजे लाखिवली, धामणे, सोनाळे व सरावली :-**

मौजे लाखिवली येथील सर्वे क्र. १८/३ व इतर ४० स.नं.च्या जमीनीचे खातेदार बाळकृष्ण नारायण पाटील हे मयत झाल्यानंतर दिनांक २९/१२/१९८० रोजी फेरफार क्रमांक ५४९ ने वारस नोंद मंजुर आहे. परंतु सदर फेरफाराची नोंद ही ४० वर्षापुर्वीची असल्याने, तहसीलदार भिवंडी यांनी दि. ११/११/२०२१ रोजीचे पत्रान्वये सक्षम न्यायालयात अपिल करुन दाद मागणे आवश्यक असल्याबाबत अर्जदार यांना कळविलेले आहे.

मौजे धामणे येथील स.नं. ३९/१ व इतर १५ या जमीनीबाबत फेरफार क्रमांक १०८, दिनांक १५/०३/१९५७ नुसार लिकीर गणु गुळवी यांचे नाव सदर जमीनीला साधे कुळ म्हणुन दाखल झाले आहे.

त्यानंतर फेरफार क्रमांक १८७ दिनांक ०१/०२/१९६९ नुसार वर्दी अर्जावरुन त्यांनी जमीनीचा काही हिस्सा आपल्या भावांना दिला आहे. तदूनंतर सदर मिळकतीबाबत वेळोवेळी फेरफार नोंदी झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार यांना सदरचा फेरफार मान्य नसल्यास त्यांनी सदर फेरफाराविरूद्ध योग्य त्या सक्षम न्यायालयात अपील दाखल करून दाद मागण्याबाबत तहसीलदार भिवंडी यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक ११/११/२०२१ अन्वये कळविणेत आलेले आहे.

श्री. रमेश विठू माळी यांना मौजे सोनाळे स.नं. १९६/७पै व इतर ६ व मौजे सरावली स.नं. ३/१ व इतर ६ या जमिनींबाबत फेरफार क्रमांक ७८८, दि. १२/१२/१९७३ व मौजे सरवली येथील जमिन स.नं. ३/१ व इतर ६ बाबत फेरफार क्र. २०३, दि.१२/१२/१९३६ मान्य नसल्यास त्यांनी सदर फेरफाराविरुध्द योग्य त्या सक्षम न्यायालयात अपील दाखल करुन दाद मागण्याबाबत तलाठी साझा सोनाळे यांनी त्यांचेकडील दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

******

लक्षवेधी सुचना क्र.२१२२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा. श्रीमती सरोज अहिरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१२२ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात एक लाख दहा हजार अंगणवाड्या कार्यरत असणे, सदर अंगणवाड्यामार्फत कुपोषण निर्मूलनाचा कार्यक्रम राबविला जाणे, यासाठी सहा महिने ते तीन वर्षे तीन वर्षे ते सहा वर्षे स्तनदा माता व गरोदर माता यांना पूरक पोषण आहार पुरवठा केला जात असणे, शासनाच्या धोरणाप्रमाणे पूरक पोषणपुरवठा आहार हा विहित मुदतीत आणि मागणी केल्यानंतर विहितकालावधीमध्ये पुरवठा करणे आवश्यक असणे सदर पुरवठादाराने दिलेल्या कालावधीमध्ये आहार पुरवठा केला नाही तर संबंधित पुरवठादाराला दंड आकारणी करावयाची असणे, जे पुरवठादार आहार पुरवठ्याच्या पोहोच पावत्या त्यांच्या कार्यालयामध्ये प्रिंट करीत असणे व कार्यालयामध्ये प्रिंटिंग वेळेस प्रिंट केलेला दिनांक हा पुरवठादार वाटपाचा दिनांक दाखवत असणे, वास्तविक ज्यादिवशी आहार वाटप करतात तोच दिनांक त्या पावत्यावर टाकणं आवश्यक असताना अंगणवाडी सेविकेना दहशत दाखवून दिनांक टाकून त्यांना दिनांक टाकु दिला जात नसणे व त्यामुळे अंगणवाडीला आहार पुरवठा हा वेळेत होत नाही, पर्यायाने मुलांनाही आहार वेळेत दिला जात नसणे, त्यामुळे कुपोषणामध्ये कमी नसणे, आहार उशिरा पुरवठा केल्यामुळे जो दंड संबंधित पुरवठादार यांना होणे आवश्यक आहे तोही लावला जात नाही यामध्ये शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होणे, यासर्व गंभीरप्रकाराची एसआयटी स्थापन करून चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रात पुरक पोषण आहार घेणाऱ्या लाभार्थ्यांची गट निहाय संख्या | | |
|---|---|---|
| ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांची संख्या | ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांची संख्या | गरोदर महिला व स्तनदा मातांची संख्या |
| २९७७२०५ | २६१५५२९ | १०६६९१७ |

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता व किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार (THR) पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई या संस्थेमार्फत घरपोच आहार (THR) पुरवठयाकरीता ग्रामीण प्रकल्पांमध्ये संबंधित जिल्हयाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचे मार्फत प्रकल्पनिहाय व अंगणवाडी निहाय THR आहाराची मागणी महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई यांचेकडे नोदविली जाते. मागणी नोंदविल्यानंतर ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई यांचेमार्फत अंगणवाडी स्तरावर THR आहाराचा पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार अंगणवाडी स्तरावर आहार प्राप्त झाल्यानंतर संबंधित अंगणवाडी सेविकेमार्फत आहार सुस्थितीत व लाभार्थी मागणीप्रमाणे प्राप्त झाल्याबाबतची खात्री करुन डिलेव्हरी चलनावर सही दिली जाते. तद्नंतर अंगणवाडी स्तरावर आहाराचा पुरवठा प्राप्त झाल्यानंतर अंगणवाडी सेविकेमार्फत अंगणवाडीतील नोंदणीकृत लाभार्थ्यांना घरपोच आहाराचे वाटप करण्यात येते.

राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ११०४४६ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित असून सदर अंगणवाडी केंद्रात आहाराचा पुरवठा करण्यात येतो. सदर अंगणवाडी केंद्रात कार्यरत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचेवर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकून पुरवठा चलनावर सही घेत असल्याबाबतच्या तक्रारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्तालय, जिल्हा कार्यालय, प्रकल्प कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच अंगणवाडी कर्मचारी संघटना अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नांबाबत जागरुक असते, त्यांचेमार्फत देखील अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

पुरवठा धारकांमार्फत ज्या दिवशी अंगणवाडी केंद्रात आहार पुरवठा केला जातो. त्या दिवशी असलेल्या दिनांकानुसार अंगणवाडी सेविकेमार्फत डिलेव्हरी चलनावर आहार प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद करण्यात येतो. अंगणवाडी सेविकांवर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकला जात नाही. ज्या ठिकाणी उशिरा पुरवठा केला जातो. त्या ठिकाणी करारनाम्याच्या अटी शर्ती नुसार दंड आकारण्यात येतो. सदर अटी शर्तीनुसार अद्यापपर्यंत पुरक पोषण आहार पुरवठा संस्थांना रु. ३७ लक्ष ८५ हजार एवढा दंड आकारण्यात आलेला असून सदरची रक्कम संबंधित पुरवठाधारकाच्या देयकातून वसूल करण्यात आलेली आहे.

मागील २ वर्षाच्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्षे | एकुण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | टक्केवारी | मध्यम कमी वजनाची बालके | टक्केवारी | तीव्र कमी वजनाची बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०२१ | ६१६१०२५ | ५६२२८१० | ९१.२६ | ४५६३११ | ७.४१ | ८१९०४ | १.३३ |
| ऑक्टोबर २०२३ | ५७८१५४५ | ५२९९८०८ | ९१.६७ | ४०६९२३ | ७.०४ | ७४८१४ | १.२९ |

वरील आकडेवारी विचारात घेता कुपोषणाच्या प्रमाणात घट होत असल्याचे दिसून येत आहे.

सद्यस्थितीत घरपोच आहार पुरवठयाबाबत माहे एप्रिल २०२३ मध्ये निविदा प्रकाशित केलेली होती. सदर निविदेनुसार संपुर्ण राज्यात घरपोच आहार पुरवठा करण्यासाठी पुरवठाधारकांची शासन निर्णय दिनांक २.१.२०२४ अन्वये निवड झालेली असून संबंधित पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत तसेच पुरवठाधारकांसोबत करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार नवीन पुरवठाधारकांनी पुरवठयाची कार्यवाही सुरु केलेली आहे. नव्याने पुरवठाधारकांची नियुक्ती झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन, मुंबई यांचे ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला आणि स्तनदा माता यांना पुरवठा करावयाच्या घरपोच आहाराचे काम बंद करण्यात आलेले आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

**********

<u>लक्षवेधी सूचनाक्र.१८५४</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

श्री. यशवंत माने, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८५४ पुढीलप्रमाणे आहे:-

"ग्रामपंचायत अनगर- कोंबडवाडी, नालबंदवाडी, खंडोबाचीवाडी, कुरणवाडी (अ) या चार ग्रामपंचायतीची मिळून अनगर नगरपंचायतची स्थापना ०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी होणे, सदर नगरपंचायतमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ची अंमलबजावणी करण्यांत यावी या हेतूने ४७० लाभार्थ्यांचा प्रस्ताव म्हाडा कार्यालयाकडे सादर करण्यांत येणे, सदर प्रस्तावाला केंद्रस्तरीय बैठकीमध्ये अनगर नगरपंचायतीस मिशन सिटीमध्ये संलग्न अंमलबजावणी करण्याच्या अटीने मंजुरी देण्यांत येणे, अनगर नगरपंचायतीचा ४७० लाभार्थ्यांचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आल्याचे म्हाडाद्वारे सांगण्यात येणे, पुन्हा तो प्रस्ताव ३६ व्या slsmc बैठकीत Recertification मध्ये टाकून केंद्र शासनाकडे सादर करण्यांत येणे, या प्रस्तावावरील एकूण २५० लाभार्थ्यांनी बांधकाम सुरु केले असून त्यांना निधी देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास येणे, अनगर नगरपंचायतीस pmay mission city मध्ये संलग्न करण्यात येऊन प्रस्ताव १००टक्के Attachmnet देखील करण्यांत येणे, प्रकल्पातील लाभार्थ्यांना बांधकाम परवाने वितरित करुन Geo tagging देखील सुरु करण्यांत येऊन प्रस्तावास MIS वर केंद्र शासनाद्वारे मंजुरी देण्यात येणे, परंतु माहे सप्टेंबर, २००३ पासून सदर प्रस्ताव mis पोर्टलवर आढळून न येणे, तसेच Geo tagging देखील बंद झालेले असणे, त्यामुळे योजनेअंतर्गत घरबांधकाम करणाऱ्यांना अनुदान मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन लाभार्थ्यांना पुढील कामांना अनुदान चालू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेअंतर्गत अनगर नगरपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत योजना राबविण्यासाठी मुख्याधिकारी, नगरपंचायत, अनगर यांचेकडून ४७० घरकुलांचा प्रस्ताव दिनांक ०४.०३.२०२२ रोजी म्हाडा कार्यालयाकडे प्राप्त झाला.

अनगर नगरपंचायतीचा समावेश मिशन सिटीमध्ये नसल्यामुळे SLAC च्या दिनांक १७.०३.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत "अनगर नगरपंचायत मिशन सिटीमध्ये येण्याच्या अटीवर राज्यस्तरीय मान्यता व संनियत्रण समिती (SLSMC)कडे प्रस्तावित करण्यात आले. राज्यस्तरीय मान्यता व संनियत्रण समिती (SLSMC) च्या दिनांक २१.०३.२०२२ रोजी झालेल्या ३१ व्या बैठकीमध्ये याच अटीवर सदर प्रकल्प अहवाल CSMC च्या बैठकीमध्ये मंजूरीसाठी प्रस्तावित

करण्यात आला. केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) च्या दिनांक ३०.०३.२०२२ रोजी झालेल्या ६० व्या बैठकीस सदर अटीच्या अधीनतेने दिली होती.

अनगर नगरपंचायतीचा समावेश मिशन सिटीमध्ये झाला नसल्याने दिनांक १८.०८.२०२२ रोजी SLAC च्या ३७ व्या बैठकीत सदर अनगर नगरपंचायतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रद्द करण्यासाठी SLSMC कडे प्रस्तावित करण्यात आली. SLSMC च्या दिनांक २६.०८.२०२३ रोजी झालेल्या ३२ व्या बैठकीत सदर प्रकल्प रद्द करण्यासाठी केंद्रीय मान्यता व संनियत्रण समिती (CSMC)कडे प्रस्तावित करण्यात आले. दिनांक २७.०२.२०२३ रोजी केंद्रीय मान्यता व संनियत्रण समिती (CSMC)च्या ६५ व्याबैठकीत अनगर नगरपंचायतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रद्द करण्यात आला.

केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) च्या दिनांक २७.०२.२०२३ रोजी झालेल्या बैठकी पर्यंत सदर अनगर नगरपंचायतीचा समावेश मिशन सिटीमध्ये नव्हता. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अनगर नगरपंचायतीचा समावेश केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय (HFA-IV) क्र. N-११०११/१/२०१७-HFA-IV (E-९०१७८२) दिनांक २८.०२.२०२३ द्वारे मिशन सिटीमध्ये समाविष्ट करण्यात आले. तद्नंतर SLSMC च्या दिनांक २३.०६.२०२३ रोजी झालेल्या ३६ व्याबैठकीत अनगर नगरपंचायतीचा ४७० घरकुलांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) Ratification and Reapproval साठी केंद्रीय मान्यता व संनियत्रण समिती (CSMC) च्या दिनांक १८.१०.२०२३ रोजी झालेल्या ६८ व्या बैठकीत प्रस्तावित करण्यात आले परंतु सदर प्रस्तावाबाबत केंद्रीय मान्यता व संनियत्रण समिती(CSMC) ने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

MIS portal वर सदर प्रकल्पाविषयी माहिती अपलोड करण्यासाठी अनगर नगरपंचायतीस दिनांक ०२.०३.२०२३ रोजी Login Id व password देण्यात आला. अनगर नगरपंचायती मार्फत दिनांक ०९.०५.२०२३ पासुन Geo-tagging करण्यास सुरु करण्यात आले परंतु सदर प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) ने अद्यापही मान्यता न दिल्याने सदरचा प्रकल्प MIS portal वर आढळून येत नसून Geo-tagging देखील करता येत नाही, अंमलबजावणी यंत्रणेला अधिकृत करण्याची बाब CSMC च्या अखत्यारीतील आहे.

अनगर नगरपंचायतीच्या ४७० घरकुलांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) CSMC कडून मंजूरी घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीच्या मान्यतेनंतर अनगर नगरपंचायतीला निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

*****

लक्षवेधी सूचना क्र.२१४१

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री. मा. श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" राज्यांत बहुसंख्य आदिवासी जिल्हयातील आदिवासी जमिन मिळकतीसाठी मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० व २०१३ मध्ये आदिवासी शासन निर्णय २०१३/ प्रकरण क्रमांक २५ प्रमाणे मा उच्च न्यायालय व शासनाकडुन आदिवासी जमिन मिळकतीबाबत निर्देश मिळालेले असणे, जुन्या १९७५ पासुनचे आदिवासी जमिन मिळकतीमध्ये कलम ३६ ची परवानगी न घेतलेल्या अशा बिगर आदिवासी प्रकरणांमध्ये पुर्नविलोकन करुन संबंधित बिगर आदिवासींचे फेरफारांच्या नोंदी कमी करणेसाठी दिनांक ०४/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हाधिक्षक, भुमिअभिलेख यांना आदिवासी नागरीकांनी तक्रार दिली असुन तक्रारीबाबत कोणीतीही पुर्नविलोकनाखाली कोणतीच कारवाई होत नसल्याचे दिसुन येणे, शासनाने या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्री काळूराम पांडुरंग धापसी यांचे कुलमुखत्यारी नागेश किसनराव निमकर यांनी मौजे नारपोली ता. भिवंडी, जि, ठाणे येथील सर्व्हे क्र. ११६ पैकी, ११६/३/३, ८८, ८९, ९० पैकी ही जमीन आदिवासी मिळकत असुन, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ व ३६ (अ) ला अधिन असलेल्या जमिर्नीना शासनाकडुन परवानगी न घेतल्याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेबाबत दिनांक ०४/१२/२०२३ रोजीचा अर्ज जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयात दिनांक ०५/१२/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे.

त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

मौजे-नारपोली, ता-भिवंडी स.नं. ११६ पैकी ११६/३/३ क्षेत्र ०-०७-९४ आर.चौ.मी., स.नं. ८८ क्षेत्र ४.५०.०० आर चौ.मी., स.नं. ८९ क्षेत्र १५.५१.८५ आर. चौ.मी., व स.नं. ९०, क्षेत्र १२.००.६० आर चौ.मी. या जमीन मिळकती आजरोजी खाजगी व्यक्तींचे नांवे आहेत. तसेच स.नं. ११६/३/३, ८८, ८९/२/१ ही जमीन बिनशेती असलेचे दिसुन येत आहे. तसेच स.नं. ९० ही जमीन आज रोजी बिनशेती नसून गाव अभिलेखातील ७/१२ चे पीक पहाणी सदरी ओस अशी नोंद दिसुन येत आहे.

मौजे-नारपोली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स.नं. ११६ पैकी, (संगणकीकृत स.नं. ११६/३/३) क्षेत्र ०-०७-९४ आर चौ.मी. ही जमीन श्री. गजानन शंकर घरत यांनी चंद्रया गोपाळ डुकले यांचेकडुन खरेदी केलेली आहे. त्यानुसार फेरफार क्रमांक ७०५, दि. ४/९/१९७३ अन्वये अधिकार अभिलेखात नोंद घेण्यात आली असुन आजरोजी ७/१२ सदरी श्री. गजानन शंकर घरत यांचे नांव दिसुन येत आहे. फेरफार क्रमांक ५९४, दिनांक १७/११/१९६८ अन्वये चंद्रया गोपाळ डुकले यांचे नांव कुळ म्हणुन कमी झालेले आहे.

मौजे-नारपोली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स.नं. ८८, क्षेत्र ४.५०.०० आर.चौ.मी. व स.नं. ८९ (संगणकीकृत स.नं. ८९/२/१), क्षेत्र १५.५१.८५ आर चौ.मी. ही जमीन श्री. कुंदन हेदर म्हात्रे यांनी चंद्रया गोपाळ डुकले यांचेकडुन खरेदीने घेतलेली आहे. त्यानुसार फेरफार क्रमांक ५५५, दि. १०.११.१९६६ अन्वये अधिकार अभिलेखात नोंद घेण्यात आली आहे. फेरफार क्रमांक ५९४. दिनांक १७/११/१९६८ अन्वये चंद्रया गोपाळ डुकले यांचे नांव कुळ म्हणुन कमी झाले आहे. फेरफार क्रमांक २३८०, दि. १४/०७/१९९५ अन्वये ७/१२ सदरी सतीशकुमार रमेशचंद्र सोमाणी व इतर ३ यांचे नांव दाखल झाले आहे.

तालुका हुकूम नं.RTS/WS/1867- 2/2/62 अन्वये फेन हुसेन महमंद अली बोहरी यांचे मालकीचे स.नं. ९० (संगणकीकृत स.नं. २१८/१) क्षेत्र १२.००.६० आर.चौ.मी या जमीनीस फेरफार क्र. अस्पष्ट दिनांक ०२.२.१९६२ अन्वये कुळ चंद्रया गोपाळ वारली यांचे नांव कुळ म्हणुन कमी झाले आहे. स.नं. ९० (संगणकीकृत स.नं. २१८/१) क्षेत्र १२.००.६० आर.चौ.मी. या जमीन मिळकतीचे आजरोजी ७/१२ सदरी इकबाल अब्दुल वाहीद मेमन व इतर यांचे नांवे वारसाने दाखल झालेली आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सन १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.३५ च्या कलम ३ अन्वये कलम ३६(अ) समाविष्ट करण्यात आलेले आहे. कलम ३६(अ) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ अंमलात आल्याच्या दिनांकापासून आदिवासी जमीन धारकाच्या जमिनी बिगर आदिवासी यांना विक्री/हस्तांतरण करण्यास शासनाची पूर्वमंजूरी घेणे अनिवार्य केले आहे.

सदर प्रकरणी ता. भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे क्र. ११६ पैकी स.नं. ११६/३/३, स.नं.८८, सं.नं.८९ व स.नं. ९० येथील आदिवासी धारकाकडून बिगर आदिवासी खरेदीदाराकडे झालेले जमिनीचे व्यवहार महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ च्या अंमलापूर्वी झालेले दिसून येत आहेत. तथापि, श्री काळूराम पांडुरंग धापसी यांचे कुलमुखत्यारी नागेश किसनराव निमकर यांच्या दि.०४.१२.२०२३ च्या निवेदनातील संबंधित मिळकतीबाबत महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ मधील तरतुदीनुसार तपासुन नियमानुसार कार्यवाही तहसिलदार, भिवंडी यांचेकडून करणेत येत आहे तसेच जनहित याचिका क्र.१२०/२०१० च्या अनुषंगाने शासन परिपत्रक आदिवासी -२०१३/प्र.क्र.२५/ल-९, दि.२६.०३.२०१३ अन्वये चौकशी करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी यांना देण्यात येत आहेत.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२१३९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे-माजीवाडा या जमिनीमध्ये विशेष नगर वसाहत उभी करत असताना मौजे-माजिवाडा येथील फेरफार क्रं. ५२६, ५७१, ६२१, ६३२ पाहता वर्मा कुटुंबियांनी १५ वर्षाच्या गहाणखताने जमिन घेणे, सदर जमिन खालसा करण्यात येऊन माजिवाडा टेनेंन्ट फर्मिंग सोसायटी यांना कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदी खताने जमिन शासनाने देणे, परंतु १९९९ नंतर कॅपस्टोन कंपनीने त्याठिकाणी खरेदी विक्री चालू करत असतांना ४४ वर्षाचे विलंब मुदत माफ करुन माजिवाडा टेनेंन्ट फर्मिंग सोसायटीचे खरेदी दस्त रद्द न करता नाव कमी करुन विकासक कॅपस्टोन कंपनीला ही जागा डेव्हलप करण्यासाठी शासनाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करुन वर्मा कुटुंबियांचे सातबाऱ्यावरील इतर हक्कात नोंद घेतल्यानंतर तात्काळ भोगवटदार सदरी नोंद घेऊन कॅपस्टोन कंपनीला जमिन विकण्यात येणे, या जमिन प्रकरणातील गैरप्रकार पाहता फेरफार क्रं. १३९९ मध्ये कुठल्याही प्रकारचे आदेश हुकूम झालेले नसल्यामुळे तात्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करुन फेरफारामध्ये बेकायदेशीर नोंदी केल्याने विकासकाने याचा पुर्ण फायदा घेऊन बनावट पध्दतीने झालेल्या टायटल शिर्षक बेकायदेशीर असणे, शासनाने विशेष नगर वसाहतचा दर्जा न देण्यासाठी तथा तो दर्जा रद्द करण्यासाठी शासनाकडुन तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे माजिवाडा, ता.जि. ठाणे येथील सर्व्हे नं.१२ व इतर ३२ सर्व्हे नं. चे एकूण क्षेत्र ४६-४७-७१ हे.आर. हे फेरफार क्रं. ५२६, दि.२४/०१/१९४४ अन्वये विनायक सातघरे व इतर यांचेकडून मुहम्मद अली ताजाभाई यांनी तर फेरफार क्रं. ५६७, दि.१६/०७/१९४६ अन्वये महम्मद अली ताजाभाई यांचेकडून गणपतराय हरकलाल यांनी खरेदी केले होते.

मौजे माजिवाडा, ता.जि. ठाणे येथील सर्व्हे नं.१२ व इतर ३२ सर्व्हे नं. चे एकूण क्षेत्र ४६-४७-७१ हे.आर. हे फेरफार क्रं. ५७१, दि. ०१/०९/१९४६ अन्वये कब्जेगहाण खताने, फेरफार क्रं. ६२१, दि. ०९/१२/१९४७ अन्वये तारण गहाण खताने, फेरफार क्रं. ६३२, दि.१०/१२/१९४७ अन्वये फरदर चार्ज नुसार गणपतराय हरकलाल यांचेकडून आर.एस.वर्मा यांनी प्राप्त केले आहे.

तद्नंतर मौजे माजिवाडा, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्रं. ९८३, दि. २९/०१/१९५८ अन्वये सदरचे ४६-४७-७१ हे.आर. एवढे क्षेत्र मुंबई टेनन्सी आणि ॲग्रीक्लचर लॅण्ड ॲक्ट चे कलम ६५ अन्वये खालसा करून तालुका माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटी यांना १० वर्षाच्या लागवडीस दिले होते. त्याबाबत जिल्हयाचा हुकुम दि.२१/०४/१९५० अन्वये कब्जेदार सदरी सरकार नाव दाखल करुन इतर हक्कांत श्री. आर.एस. वर्मा यांचे नाव दाखल करण्यात आले होते. तसेच माजिवडे टेनन्ट फार्मिंग कंपनीचे नाव कुळ म्हणून इतर हक्कात दाखल केले होते.

मौजे माजिवाडा, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्रं. १२४०, दि.२५/१०/१९६१ अन्वये सदरचे ४६-४७-७१ हे.आर. एवढे क्षेत्र मुंबई टेनन्सी आणि ॲग्रीक्लचर लॅण्ड ॲक्ट प्रमाणे सरकारच्या ताब्यात घेतलेली जमीन दर्शनी कब्जा दिलेबद्दल मे.ॲडीशनल क्लेक्टर ठाणे यांचेकडील दि.२९/९/१९५९ रोजीच्या आदेशाने व तालुका हुकुम दि.२४/१०/१९६३ नुसार सदर जमिनीस असलेले सरकार नाव कमी करुन श्री. आर.एस. वर्मा यांचे नाव दाखल केले गेले. फेरफार क्र.१३९९, दि.०५.१२.१९६६ अन्वये सदर क्षेत्राच्या अधिकार अभिलेख सदरी माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटीचे कुळ म्हणून असलेली नोंद कमी करण्यासाठी दि.२७/०८/१९६५ रोजी कब्जे पावतीची नक्कल जोडून केलेल्या अर्जाप्रमाणे वर्दी घेऊन तालुका हुकुम दि.०५/१२/१९६६ नुसार कुळाची नोंद कमी करुन श्री. आर.एस. वर्मा यांचे नावाची नोंद जमिनीच्या कब्जेदार सदरी दाखल केली. आर.एस.वर्मा हे दि.१२/१२/१९७१ रोजी मयत झाल्याने त्यांच्या वारसांची नावे उदयसिंग वर्मा व इतर हे नाव दाखल करण्यात आले.

मौजे माजिवाडा, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे न.१२ व इतर सर्व्हे न. च्या ४६-४७-७१ हे.आर. एवढया क्षेत्रापैकी ४.५६.३८ हे.आर. क्षेत्र हे राष्ट्रीय महामार्ग क्रं.३ करिता भूसंपादनामध्ये गेलेले असून उर्वरीत क्षेत्र ४१.९१.३३ हे.आर. वर उदयसिंग आर. वर्मा यांचे नाव दाखल होते. परंतू ते १२/०४/१९८५ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस अशोक उदयसिंग वर्मा व इतर यांचेकडून कॅपस्टोन प्रॉपर्टिज प्रा. लि. व इतर यांनी दुय्यम निबंधक, ठाणे यांचेसमोर केलेल्या विकासकरारा अन्वये विकासक म्हणून मे. कॅपस्टोन कंस्ट्रक्शन प्रा.लि. चे संचालक बोमन रुस्तम इराणी यांच्या नावाची ७/१२ चे इतर हक्कात नोंद केलेली आहे. अशा प्रकारे तालुका माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटी यांना १० वर्षाच्या लागवडीस देताना फेरफार क्रं. ९८३ अन्वये जमीन खालसा करण्यात आलेली होती. परंतु ती नोंद फेरफार क्रं. १२४० अन्वये कमी झालेली आहे. त्यानंतर निरंतर आजतागायत वर्मा कुटुंबियाचे नावे जमीन असून विकास करण्यासाठी मे. कॅपस्टोन प्रा.लि. कंपनीचे संचालक बोमन रुस्तम इराणी यांना दिल्याचे दिसून येते.

नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक २४/०८/२००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार विशेष वसाहत म्हणून दि.२४/८/२००९ अन्वये मौजे माजिवडा ता.जि.ठाणे येथील एकूण २१२ सर्व्हे मधील क्षेत्र ५२-७०-१९ हे.आर पैकी ४८-२०-०२ हे.आर क्षेत्र हे विशेष नगर वसाहत अंतर्गत विकास करणेकामी शासनाने घोषित केलेले आहे.

यास्तव, सदर क्षेत्राचे विशेष वसाहत म्हणून या क्षेत्रावर बांधकाम करण्यात आलेले आहे.

******